
कमळवेल
वि. म. कुळकर्णी

# कमळ वेल

वि. म. कुलकर्णी

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

# कमळवेल

वि. म. कुलकर्णी

किंमत दीड रुपया

चित्रशाळा प्रकाशन : पुणें २

मुद्रक व प्रकाशक
दामोदर त्र्यंबक जोशी
( बी. ए. टिळक )
चित्रशाळा प्रेस, १०२६
सदाशिव पेठ, पुणें नं. २.

आवृत्ति पहिली
ऑगस्ट १९५२

सर्व हक्क लेखकाधीन

# निवेदन

'पहांटवारा' या संग्रहानंतर आज माझ्या कांही कवितांचा हा दुसरा संग्रह रसिकांच्या हवालीं करीत आहे. यांतील बहुतेक कविता १९४८ ते १९५२ या कालांत लिहिलेल्या आहेत.

सुप्रसिद्ध कविवर्य प्रा. द. रा. बेंद्रे यांनी या संग्रहास समीक्षणात्मक प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

माझ्या अनेक सुहृदांनी व संपादकमित्रांनी जें उत्तेजन दिलें तेंहि सादर मनाने नमूद करावेसें वाटतें. मित्रवर्य प्रा. मा. ग. बुद्धिसागर, प्रा. गो. म. कुलकर्णी व श्री. त्र्यं. वि. सरदेशमुख यांनी प्रेमळ सूचनाद्वारें व अन्य रीतींनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल मी त्यांचा आभारी आहें. या संग्रहांतील सर्वाधिक कविता 'सत्यकथे'तून प्रथम प्रकाशित झाल्या; 'सत्यकथेचे' श्री. भागवत बंधु यांचेंहि मी मनापासून आभार मानतों.

चित्रशाळेचे श्री. दा. पां. रानडे व श्री. दा. त्र्यं. जोशी यांनी मनावर घेऊन हा संग्रह प्रकाशित केला याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत.

संग्रहांतील जयस्तंभ (क्र. ३८) ही कविता शेलीच्या Ozymandias' या कवितेवरून लिहिलेली आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेने मान्य केलेल्या पद्धतीनुसार शुद्धलेखन ठेवलें आहे—

दयानंद कॉलेज, सोलापूर<br>
ता. १५ ऑगस्ट १९५२

वि. म. कुलकर्णी

# अनुक्रमणिका


१ कमळवेल - - - - १.
२ हिरवी झाडी - - - ३.
३ दोरीवरचें पातळ - - ५.
४ तुझे ते डोळे - - ६.
५ ते हात - - - - ८.
६ गावीं जातांना - - ९.
७ अरे छायाचित्रकारा - १०.
८ माझी मराठी - - १२.
९ दिवा विझविला - - १४.
१० कोळिच्या हो बागेवरन - १६.
११ भर दुपार - - - १७.
१२ अर्घ्य - - - १९.
१३ अग्ने ! किमया - - २०.
१४ मोरपिसावरि लहरी उठती २१.
१५ आहे मजा आईचीच - २२.
१६ त्रास - - - - २३.
१७ कृष्णेचें पुनर्दर्शन - - २४.
१८ ती शाळा - - - २७.
१९ हिरवीं कोंडीं - - - २९.
२० मामाचा गाव आला - ३१.
२१ माझ्या अश्रूंनो - - ३३.
२२ ढगांमागे ढग उभे - ३४.
२३ नकोच दर्शन - - ३५.
२४ संपला सिनेमा - - ३७.
२५ विटेवरी - - - ३८.
२६ गौरवर्ण हा तुझा चेहरा - ३९.
२७ दहाच वर्षें - - - ४०.
२८ विसंगती - - - ४१.
२९ झाडामागुन चंद्र हासला ४२.
३० मध्यान्हवेळीं - - ४४.
३१ कशासाठी - - - ४६.
३२ वरात - - - ४७.
३३ येती वळिवाच्या सरी - ४८.
३४ नागमोडी लाल रस्ता - ४९.
३५ फीर मना मागे आता - ५१.
३६ एक पायवाट - - ५२.
३७ चित्र देवावरचें - - ५४.
३८ जयस्तंभ - - - ५५.
३९ तुझ्या हिरव्या अंगणीं - ५६.
४० कां पुन्हा - - - ५७.
४१ श्रावणांतली सकाळ - ५८.
४२ चांदण्यांत सहलतां - ६०.
४३ जाहलें सार्थक - - ६१.
४४ रिकामें टेबल - - ६३.
४५ नित्य तळपते दुपार - ६४.
४६ कळींतून पाकळींत - - ६५.
४७ कधी कधी - - ६७.
४८ एखादे दिवशीं - - ६९.
४९ बाजारपेठेंत - - ७०.
५० आज नवा क्षण - - ७१.
५१ पृथ्वीचे हे संत - - ७१.
५२ कारवार - - ७४.
५३ जीवनसखे ! - - ७५.
५४ माझें इनाम कवित्व ८०.

# प्रस्तावना

माझे सहोद्योगी कविमित्र प्राध्यापक वि. म. कुलकर्णी यांच्या 'कमळवेल' या कवितासंग्रहाला मी प्रस्तावना लिहावी असा प्रस्ताव त्यांनी गेल्या वर्षी केला. मी आपुलकीने व आवडीने त्यांच्या प्रस्तावाला मान्यताहि दिली. परंतु पुस्तकप्रकाशन कांही कारणामुळें पुढें पडलें. तरी, या वर्षीहि त्यांचा निर्धार कायम राहिला. संग्रहांतील कांही कविता गेल्या, कांही नवीन आल्या. प्रकाशक बदलले, खरनाम संवत्सराचा शेवट झाला. इकडे त्यांचें कवितालेखन चालूच होतें. अधूनमधून ते त्या मला वाचून दाखवीत. आमच्या स्नेहांतहि वाढ होती. त्यांच्या कविता ऐकून, वाचून, कविप्रतिभेच्या या नव्या दर्शनाने मला सहृदयतेला सहज असा प्रेमा वाटे. मोकळ्या मनाने मी माझे विचार बोलूनहि दाखवीत असें. श्री. कुलकर्णी 'वि. म.' ना माझा दृष्टिकोन बऱ्याच वेळां नवीन वाटला. आपल्या कवितेच्या निमित्ताने माझे समीक्षक विचार महाराष्ट्रीय वाचकांपुढे मांडल्यास हें वाण अमान्य तरी खास होणार नाही असें त्यांना वाटल्यामुळें; आणि कदाचित् कांही अभिरुचीला मान्य होईलहि असें मला वाटत असल्यामुळे प्रस्तावनेची ही संधी न दवडतां मी मनमोकळेपणानेच हें लिहीत आहें.

माझ्या स्वभावांतहि वादिष्टपणाची लकेर आहे. तरी मला वादिष्ट लेख–प्रपंच वाचणें जमत नाही, मुळांत तें फार आवडतहि नाही. कांही जातीच्या राजकारणांत असलें लेखन–वाचन अपरिहार्य असेल. पण साहित्यसमीक्षेंत अशा लेखांनी वाङ्मय व्यापावें हें तितकेंसें बरें लक्षण नव्हे असें मला कित्येकदा वाटतें. परंतु आजच्या प्रजाशाहींत

या कसबाची चलती आहे. तेंहि असूं दे. पण यामुळे साहित्यिकांत तट पडतात; आणि आधींच साहित्य आणि साहित्यिकांविषयी आंतून फारसा आदर नसलेल्या लोकांना फावतें. त्यामुळे सांस्कृतिक विचारांत पाखंड माजतें; जीवनश्रीला अश्लीलता पछाडते; आणि रुचि कळकट-चनते. हें सामष्टिक प्रकृतीसहि हितावह नव्हे.

निष्ठेशिवाय कामें पार पडत नाहीत हें खरें. पण अतिनिष्ठेच्या एकांतिक थोतांडामुळे कामाचें खोबरें होतें; आणि करटीचा करंटेपणा हातचा सुटत नाही. आत्मनिष्ठा–सत्यनिष्ठा–जीवननिष्ठा आणि वस्तुनिष्ठा या खरें पाहिलें असतां, निजनिष्ठेच्या चार पाकळ्या आहेत. यांच्यांत चौरंगी सामन्याची लढत लागण्याची आवश्यकता नाही. एकमेकांनी एकमेकांना पूर्ण करावें. एकमेकाचीं अंगें ओरबाडणें हें परिणामीं हितावह नाही. साहित्य–साहित्यिक–समीक्षक आणि वाचक हे परस्परपूरक आहेत, असावेत. श्री. वि. म. कुलकर्णी यांच्या कवितेंत अथवा विचारसरणींत एकांगीपणाचा अट्टाहास नसल्यामुळे मी त्यांच्या कवितांच्या संग्रहाला समीक्षणात्मक प्रस्तावना लिहिणें जमून येत आहे.

या संग्रहांतील एकूण चौपन्न कवितांत बऱ्याचशा, म्हणजे १५–२० कविता व्यापकार्थाने कौटुंबिक वातावरणांत या ना त्या निमित्ताने स्फुरण पावलेल्या आहेत. आपण, आपले मित्र, आपली गृहिणी, चिरंजीव, गाव, शाळा, प्रदेश, गृहजीवन या व अशाच निमित्ताने त्यांचें काव्य स्फुरण पावतें, आणि नसतें थैमान न करतां, लालित्याने चार सहा पावलें टाकून, साकूत अपांग दृष्टिविक्षेपाने कोठें अंतरिक्षांत अथवा स्वांतरंगांत विराम पावणाऱ्या इंगिताप्रमाणे मनाला गोड चटका लावून विश्रान्त होतें. येथील काव्यविभ्रमांत कसलीतरी चटक वाढवणारी धुंदी नाही, त्यांत स्वाभाविक विलासाचा साधेपणा आहे. कुलकर्णी हे जात्या कवि आहेत. त्यांच्या नजरेंत आलेली प्रत्येक

वस्तु आपल्या स्वरूपाची धार त्यांच्या हृदयावर पाजळून जाते. तेव्हां त्यांतून कांही सूर निघतात. आणि कांहींच्या भेटीची सही, कोरलेल्या नादोल्लेखाप्रमाणे राहून जाते. या स्मृतिरेखेवरून पुढे कदाकाळीं कविभावनेची अचानक झुळूक गेली म्हणजे त्यांतून रम्य तान ऐकूं येते.'

—या कवीला आपली कविता हृदयसरोवरावरील 'कमळवेल' वाटते. येथील कमळें मात्र दिवस–रात्र दोन्ही वेळां फुलतात! काव्यानुभवांत सुखदुःखाचें द्वंद्व न बनतां दांपत्य बनते. परंतु कवीला राखीव डबक्यांतलें जोखीव जीवन नको आहे;

'नभा ! तुझी पण
विशालतेची
हवी पखरण...' (पा. २)

असें तो म्हणतो. 'माझी मराठी' (पा. १२) या कवितेंत पूर्व–कवींना जें वंदन केलें आहे त्यांतहि त्याची आवड पंथाने जखडली गेली नाही हें दिसतें, तरी

'नित्य नवें रूप दावी
मुखीं उमटते ओवी' (पा. १३)

हें मात्र खरें. येथील कवितेला मुक्तछंद मानवला तरी, 'ओवी'च्या गोतवळ्यांतून तिची पालवी फुटते. पहाटेच्या जात्यावर विसावणारी कोवळीक—येथील जातीला जवळची वाटते. कुलकर्णी यांना आपलें वतन गेलें या आपत्तीने दुःख वाटण्यापेक्षा 'माझें इनाम कवित्व–गावोगावीं गोतावळा' या भाग्याच्या भावनेनेच त्यांचें हृदय भरून येतें.

'शारदेच्या महाद्वारीं
मला मिळेल पायरी
रसिकांची पायधूळ
नित्य उधळेल शिरीं' (पा. ८०)

हा उमदेपणा येथील कवित्वाचा प्राण आहे. अभिजात कवि रसिकाविषयीं प्रेमळ आदर बाळगतो.

वि. म. कुलकर्णी यांना हिरव्या रंगाचा अतिशय मोह आहे. त्यांचें विश्व हिरवेंचार आहे. त्यांची 'हिरवी झाडी' (पा. ३) आणि 'हिरवीं कोडीं' (पा. १९) तरी असोतच, त्यांचा मास हिरवागार श्रावण आहे. त्या श्रावणाच्या हिरव्या मायेंत त्यांच्या-कविदृष्टीला, 'गिरणीचें धुराडें अन् निंब आणि बाभळीचीं झाडें अन् त्यावरील कावळे, अन् त्याजवळील परीट, आणि त्याच्याहि पलीकडील गाढवी व तिचें गोजिरें बाळ' हें दृश्य चित्रांतील देखाव्याप्रमाणे रम्य वाटतें आणि जणुं कांहीं सृष्टीच्या अभेद्य वात्सल्याची साक्ष देते (पा. ५९). हेंच काय, त्यांना संतपणाचा साक्षात्कार श्रावणाच्या हिरवळींतून, गवताच्या हुतात्मिक जीवनांतून होतो (पा. ७२). जणु कांहीं कुलकर्णींच्या कवितेनेहि श्रावणी दीक्षा घेतली आहे. दुर्दिनांतच काय, पण शिशिराच्या विकट गळतींतहि पाचूचा पाणीदार रंग राखण्याची उमेद आणि उत्साह त्यांच्या जिव्हाळ्याच्या कामनेला असावा असें दिसतें. हिरवा रंग प्राणाचा व कामदेवाचा आहे, असें म्हणतात. कुलकर्णी यांची कविता 'पोपटी कान्तीची' आहे (पा. १). 'पोपटांच्या आठवणी, तेच सुटे सुटे मणी!' (पा. १६). त्यांच्या कविता असल्या आठवणींच्या सांठवणींतील हार आहेत. 'तुझ्या हिरव्या अंगणीं' (पा. १६) या कवितेंत त्यांचें निसर्गप्रेम, साहित्य-प्रेम आणि स्नेहाळ जीवन यांचा त्रिवेणीसंगम म्हणण्यापेक्षा उगम आहे. चंद्र आणि चांदण्याविषयींहि या संग्रहांत एक दोन कविता आहेत. 'दिवा विझविला' (पा. १४) यांत चन्द्रदर्शनाने मनांत झोपून राहिलेलीं कांहीं जनतान्तरसौहृदाचीं हळुवार स्वप्नें जागीं होऊन वावरूं लागतात. यांतील उत्प्रेक्षा बाह्य स्वरूपाला भाळल्या नसून चित्रलेखेप्रमाणे अंतरींचें गुज त्या चितारूं पाहतात. 'चांदण्यांत

सहलता ' ( पा. ६० ) या कवितेंत कवीच्या शांत मनावर संचार करणारे भाव चांदण्याचाहि विसर पाडतात. रातराणीचे निःश्वास, तरुतळछायेच्या गुजगोष्टी, राममंदिरांतील शेजारतीच्या सनईचे सूर आणि गालीं हसणारा लाजरा वारा—यांच्या निवान्त संसारांत चांदणेंच फिकें पडतें ! ' चन्द्रमा मनसो जातः ' देवमनांतून चांदोबा आला, आणि चन्द्रामुळे आपलें मन निर्माण झालें अशी श्रुति आहे. चन्द्र-चन्द्रिका हें जीवमनाला व दैवी मनाला जोडणारें दिव्य निमित्त आहे. कुलकर्णी यांची जात निसर्गानेंच दिपून जाऊन त्याची कारागिरी करण्यांत गढणाऱ्याची नसून भावनेची पाकळी खुलविणारी आहे. म्हणून त्यांची कविता, निसर्गाच्या निमित्तानें काय, मानवी व्यवहाराच्या निमित्तानें काय, स्थूल अर्थाहून सूक्ष्म भावनेंत निमज्जन करणारी वाटते.

दैनंदिन व्यवहारांतील अत्यंत ओबडधोबड घटनाहि या कवीच्या सात्त्विक भावनांच मान मोडून त्यांना बोलक्या बनवतात. अशा दृश्यांत असामान्य असें कांही नाही—तीं फार वहिवाटीचीं झालीं आहेत—जग हें असेंच आहे, होतें आणि असणार—अशा दृष्टीने, दृष्टि कसली ?—अशा आंधळेपणानें आपण खुशाल तीं दिसूनहि त्यांना न पाहतां व्यवहारांत संचार करतों. नाहीतर आजपर्यंत हा व्यवहार बंद पडला असता अथवा पालटला असता. मग कविमन अशा चित्रांना वाचा देऊन साधतें तरी काय ? मानवजातीचें हें सात्त्विक मन असें ' चुकचुकून ' जीवनांत कांहीतरी, कुठेतरी चुकत आहे हे लक्षांत आणून देतें. तामसी मन आपल्या राजसिक स्वप्नांतून चुकून सात्त्विकतेंत ओघळतांना ही चुकचूक अचानक सर्वांना शुद्धीवर आणेलहि ! ज्या घरांत कानाकोपऱ्यांतून पाली चुकचुकतात तेथे कसल्या मठ्ठ डोक्याच्या माणसालाहि खरी निद्रा कशी येईल ? चुकलेलें घुबडाचें पिलूं, गिरणीकामगारांच्या जन्ममरणाची रोजची वारी, खाटीक—

खान्याकडे रवाना होणारीं भाबडीं गुरें, रात्रीचा धंदा शांत चालवणारी काळोखांतील बाजारपेठ, सिनेमा संपल्यावर घरोघर परतणारे छायोपजीवी देह, थोरामोठ्यांच्या जीवनांत केवळ खुर्ची-टेबलवजा जीवन कंठणारे पोकळ जबाबदारी लादलेले मुके जीव— यांच्यामुळे या कवीचा दुःखाचा सूर खर्जातून गुरगुरतो...चिखलांत पाय पडूं नये म्हणून बहोत हुषारीने काळोखांतून वाट काढणाऱ्याचें अचूक पदार्पण नेमकें चिखलांत पडतांच मन विचकून आपल्यां शहाणपणाबद्दल आपणच हंसावें—तसें येथे कांही होतें. अशा हास्याची डागणी सामाजिक रोगांना निदान थोडी तरी शोंवूं शकते !

या सुराहून निराळे, आर्ततेचे असे कांही सूर या कवितेतून ऐकूं येतात. शाब्दिक घमेंड नरम पडून, मौनांतून करुणा छेडली जाते ती इतकी की, ती आत्मनिर्भर्त्सनेहून भयानक वाटते. त्या भावनागुहेंतून—

आतां गिळेनाती घोट
कधी व्हावयाचा स्फोट
...स्फोट ! ( पा. ६४ )

अथवा

फीर मना मागे आता—
पुरें हें क्रंदन ! ( पा. ५१ )

असले जळजळीत उद्गार बाहेर पडतात...वरीलप्रमाणे कविमनाच्या क्षितिजावर केवळ ‘ढगामागे ढग उभे’ आहेत एवढेंच दर्शन झालें असतें तर आपण विपण्ण झालों असतों. पण या ढगांना विजेची झालर नसून यांत प्रकाशाचे पाझर आहेत. म्हणूनच कवीस वाटतें :

भितोस कां रे वृथा, मन्मना ! वृथाच नयनीं अश्रू कां हे ?
पूर्वेचा चंद्रमा आपल्या घराघरांवर चमचमताहे !
—आज नवा क्षण उमलत आहे ! ( पा. ७१ )

या प्रतीतीचा ओलावा कविहृदयांत कोठेतरी खोलांत आहे. आणि म्हणूनच त्यांच्या 'चंदनाचा मळा' प्रकाशाच्या मायेवीण सुकून जाणार नाही (पा. ३४) असें वाटतें. एके ठिकाणीं कवीने म्हटलें आहे—

—ल्वे कधी मात्र
सौजन्याची वीज
झाकावयाँ लाज
मानव्याची !
निजलाच मग
मानूनिया सूर्य
अर्पितों मी अर्घ्य
हातांतला ! (पा. १९)

हा अर्घ्य अनर्घ्य आहे ! श्रद्धेच्या श्राद्धांतून तर्पणरूपाने ओघळणारें पाणी हें नव्हे. मानवी आशिषाचा हा जिवंत झरा येत्या सूर्याच्या आराधनेकरिता स्वागताकरिता वहात असतो. रक्तामांसाचं हृदय झिरपत असतांना दैवी हृदय खड्या बोलांत आपला तारक मंत्र उच्चारते. निराशेच्या सीमा आशेच्या क्षितिजाशीं भिडतात त्या अशा.

येथील आशा निराशा दोन्ही खऱ्या आहेत. त्यांच्या ऋण—धन—प्रवाहांत गुप्त आग्नि प्रकट प्रकाशांत येतो. वि. म. जात्या कवि आहेत याची जाणीव या संग्रहाच्या पहिल्या आणि कडेच्या कवितेंतच काय पण ठिकठिकाणीं लवलवते. देवतावंदनापेक्षा त्यांना कविवंदन अपरिहार्यमान्य आहे. त्यांचें कवित्व तर खरेंच, परंतु आईच्या मायेचें अक्षय पात्र त्यांच्या हृदयांत दडलें आहे. त्यांतून भीमा, चंद्रभागा, गोदा, कृष्णा या नदीमातृकांचे पूर येतात. कृष्णातीरचा हा वारा

जनाबाईची गोवरी
बोले ' विठ्ठल, विठ्ठल '
चंद्रभागेच्या कांठचा—
लुटिला मी परिमळ ' ( पा. ५६ )

असा आनंद मानतो तो या अगाध जिव्हाळ्यामुळे. असलाच जिव्हाळा त्यांच्या प्रणयवाणींतून दुमदुमतो. म्हणूनच त्यांच्या 'कळींतून पाकळींत ' या गीतांत एक विलक्षण कळ दाबली जाते.

असो व्यथा; सुखकथा
आता मुठींत मिटलों
कळींतून पाकळींत—
उभयतां उमललों !

असे प्रामाणिक बोल उमटण्याला कळ सोसावी लागते. जीवनजुगुप्सेंतून प्राणान्तिक किंचाळ्या येतील...पण सृजनशीलता स्नेहबंधांत असते, मोकाट सुटलेल्या छांदिष्टपणांत नसते. अशा भावनेला मुक्तछन्दहि चालतो, वृत्तबंधहि बाधत नाही, कसलीहि जाति चालते; जातीच्या सुंदरांना कांहीहि चालतें—पण सौंदर्याचा जातिवन्तपणा पाहिजे. कवियाणी शापानुग्रहसमर्थ असते असें एक जुनें सुभाषित आहे. परंतु अनुग्रहापेक्षा ज्यांत शापाचा जळफळाट बेसुमार वाढतो तेथे दुर्वासाची म्हणा, दुर्दम्य वासनांची म्हणा घाण येते. निराशेच्या मरणामागून भुतांचा कोलाहल ऐकूं येतो. येथील कवितांत तसें होत नाही याचें कारण येथील ' सनत्कुमार–भाव ' होय. बालभावांतून निर्माण झालेल्या अनेक कविता या संग्रहांत आहेत. ' चित्र देवाघरचें ' ( पा. ५४ ) ही चिमुकली कविता, चिमुकली तर आहेच, पण पूर्ण आहे. हें पाहूनच दुबळे पामरहि दररोज घरोघरीं, मृत्यूच्या जबड्यांत राहूनहि ' अनिमिष नेत्राने ' किंचित्काल पाहूं शकतात. बालकांच्या ' पापणींतलें निर्मळ विश्व ' पाहून वृद्ध ताजेतवाने बनतात.

' हिरवीं कोडीं ' मनांत फुलवणारी बालसखी ( पा. २९ ) मन हालवते पण अस्थिर करीत नाही. मुलांच्या डोळ्यांत जणुं 'यक्ष यक्षी' असतात, त्यांना खेड्याच्या प्रवासांत किन्नर लोकाची माया दिसते. ( पा. ३१ )

—अशीं कितीतरी रम्य स्थळें येथें दाखवतां येतील, आणि सहृदयांना, रसिकांना सहज दिसतील. हे याच कवीचे विशेष आहेत असें मी म्हणत नाही; ही सर्वहृदयगम्य आणि कविजातीलाच रम्य वाटणारी अनुभूति आहे. ही निर्जर असते. सामान्य वाटूनहि अलौकिक असते. आणि हेंहि खरें कीं, वर्धिष्णु कवीचें कांहीतरी व्यक्तित्व ठरवून त्याच्या कपाळीं एकदा शिक्का मारला म्हणजे तो विधिलेखाप्रमाणे वचपाच अधिक घेतो !

यांतील आत्मीय वाटणाऱ्या सर्व भाव-भावना कवीच्याच खास असतील का ? अशीहि पृच्छा, नवीन काळाला धरून करावीशी वाटेल; पण रसिक हृदयाला ती ' उपरी ' वाटते. या भावकाव्यांतील नायक-नायिका, बाल-गोपाल, वाटसरू-प्रेक्षक तन्मय आहेत, येथील भावनाख्य जीवनस्पर्शी आहे, हें पुरें आहे. या जगांत सर्व सुखदुःख स्वातीच्या थेंबाप्रमाणे, वाळूच्या कणासारखें हृदयाच्या शिंपल्यांत शिरतें आणि नंतर पहावें तो मिटल्या शिंपल्याच्या सुटल्या ओठांतून पाणीदार मोतीं होऊन बाहेर येतें. अशीं कांही येथील उक्तिमौक्तिकें रसिकांच्या कंठीं राहतील यांत संशय नाही. कवीला सहृदयांची ही जिवश्चकंठश्च मैत्री औपचारिक शिरोधार्यतेहून समाधानाची वाटेल.

अखेर आता कांही कवितांविषयी प्रत्येकीं थोडें लिहिल्याशिवाय हे प्रास्ताविक बोल पुरे होणार नाहीत. ' विटेवरी ' या कवितेंतील हास्यप्रकार बहुमुखी आहे. तो कांही तिखट-गोड, आंबट-रुचकर आहे. ही व्यंजक-प्रतिभा आजच्या जीवनाच्या विटंबनेचा प्रकार लक्षांत आणून देते. मुग्ध अज्ञानाला भयानकहि एखाद्या प्रसंगीं रम्य

वाटते—त्याचें प्रत्यंतर ‘ वरात ’ या कवितेंत आहे. आपले सुख दुःखांत मूळ धरून असतें, आणि दुःख सुखांत फुलतें. अशी सुख-दुःखाची अनुभूति अखंड असते. तिच्यांत खंड पडला म्हणजे भयाचा भास धक्का देतो. याचें ओझरतें दर्शन ‘ जाहलें सार्थक ’ या कवितेंत आहे. एका ठिकाणीं कवीची ही उक्ति आहे—

कधी कधी वाटे मला
असें वाटूं नये मला
का ?
आणि पाणी लागूं नये—
असें मिठाच्या खड्याला ! ( पा. ६८ )...

कांहीतरी वाटणें बरें ? कीं न वाटणें बरें ? आपल्या रुचीचें लावण्य ज्या मिष्टपणांत अथवा मीठपणांत असतें त्याला अशास्त्रीय विधिनिषेधाचें पाणी लागलें की, मिठाचें पाणी होतें आणि पाण्याची गोडी जाते. आदर्शाच्या ओढींत जी कांही गोडी आहे ती उघड वास्तविकतेंत नाही. ज्ञान-कर्माच्या ताणींत भावनेचें तंतुवाद्य होतें, तर केव्हा केव्हा वीणासुद्धा कांही वास्तविक दृष्टीला तारा-लाकुडांचें खेळणें वाटतें ! ‘ येती वाळिवाच्या सरी ’ या अन्योक्तींतील वक्रोक्ति रसरुचिर झाली आहे. त्या अन्योक्तीची फोड करण्याच्या खटपटीपेक्षा तिच्यांतील वक्रोक्ति पटली म्हणजे जीवनाच्या कांही अगम्य स्वरूपाचा स्वभाव लक्षांत येतो. ‘ गावीं जातांना ’ या कवितेंतील ‘ लज्जत ’, किंवा ‘ विसंगती ’ तील अलंकार, अथवा अभिनव अभिसाराचें ( पा. ४२ ) सूचक वर्णन—याहीपेक्षा ‘ दहाच वर्षें...’ या कवितेंतील भाव—

—दुनिये, तुझिया पोटीं नांदती
दंभ, अनीती, आणि पाप गे,
परी फुलविसी अशी किशोरी
तुला तुझे अपराध माफ गे !—

फार रम्य वाटतो. कांही लोकांना असलें दर्शन होतच नाही जणुं ! त्यांना जीवनाचें कुरुक्षेत्र संक्रांत–किंक्रांतीच्या भेटीची आठवण करून देतें—आणि बीभत्स रसाची चटक लावते ! अथवा, त्यांचा भाव कोता आणि हाव दांडगी असते म्हणूं या ! त्यांची तृप्ति अतृप्तीचा ग्रास करूं शकत नाही. ते अल्पसंतुष्ट नसतात. किंवा असें म्हणण्यापेक्षा त्यांना संतुष्टीचें वावडें असतें हें म्हणणें बरें दिसतें. कांही जीवांचें जीवन असेंहि आहे खरें ! कोणाला द्राक्षें हातांत असतांना त्यांच्या खताचीच खंत येते ! तर कोणाला खताची रीत आणि द्राक्षाची जात पाहून अचंब्याचा उमाळा येतो आणि आपल्या जीवन–मूल्यें ठरविणाऱ्या हावऱ्या बुद्धीचाहि अचंबा वाटतो !

या कवीला जीवनाची वास्तविक दारुणता दिसत नाही असें नाही. दारुणता ही जशीच्या तशीही असह्य असते. परंतु तिच्यांत कल्पनेनें भर टाकून तिला विपरीत स्वरूप आणणें हें उलट्या काळजाचेंच असें म्हणवत नाही हें खरें—पण, या काळजाविषयीं काळजी वाटते. हें संहाराला समीप आणि उद्धाराला दूर करतें. अशा रौद्र–बीभत्साचें शिवस्वरूपहि करुण–भयंकर वाटतें. औदार्य, कान्ती, ओज, माधुर्य आदि गुण काव्यशैलींतच काय कविशीलांतही आल्याविना साहित्याचा रस वा पौरुष परिणामीं हितकारी होणार नाही. उद्देशाच्या प्रामाणिकतेप्रमाणे परिणामाच्या हितावहतेचा अजमास कविहृदयास असावा लागतो. अर्थात् हेंहि खरें की, साहित्याचें हृद्गत समजावयाला कांही हृदयाचा ठेवा मुळांतच पाहिजे; तो नसल्यामुळे दुर्बुद्धीचा आरोप, सहजच वाचक साहित्यिकांवर व साहित्यिक वाचकांवर करूं लागतात. हें रण माजतां कामा नये.

'जीवनसखे' (पा. ७५) या कवितेंत कवीचे सर्व भावप्रवाह एकमुख वाहूं लागतात आणि आपण या जीवन–रंगभूमीवर

उठल्यासुटल्या सूत्रधाराच्या तोऱ्याने मिरविण्यापेक्षा बाहुल्याच्या भूमिकेंत वावरणें जास्त सरस आहे हा स्फूर्त विचार मूर्त होतो. या संग्रहाला हा समारोप साजेसा आहे. त्या संग्रहांतील कविदर्शन केवळ वैयक्तिक अथवा निव्वळ कल्पनारम्य नाही. क्रांतीच्या तडाख्यांत सांपडून तें दिग्भ्रांतहि झालेलें नाही. या कविदृष्टींत कौतुक मरणातुर नाही—एवढेंच नव्हे,—अचाट कंटाळलेल्यांना सोडल्यास—येथील कौतुक अन्यत्रविकासी आहे—त्याला भविष्याचा दरवाजा उघडा आहे. येथील वस्तुनिष्ठा जीवननिष्ठेला भेडसावूं शकत नाही; आणि आत्मनिष्ठा सत्यनिष्ठेशी प्रतारणेनें वागत नाही. —आत्मवंचना अधःपाती आहे हें खरें; पण "माया बाजार ! नरक ! नरक !" म्हणून आरोळी ठोकीत आत्मनिर्भर्त्सनेचें बंड पुकारणें हा कोणता पुरुषार्थ ! या संचारी भावाची आवश्यकता कळते. पण हाच स्थायी होऊं देणें मानवसमष्टीला हितावह नाही.—दुष्कृत्यानें रचलेल्या आणि खचलेल्या या जगांत रसाळ शब्द तो काय परिणाम करूं शकेल असें वाटेलहि ! परंतु लाव्हारसाने भाजून निघालेली भूमीहि हिरवळीशी त्रिलगते. भूमीचा हिरवेपणा पोषक आहे, माणसाचा हिरवटपणा शोषक आहे. ईक्षणाप्रमाणे समीक्षणांतहि या विवेकाचें मूल्य मोठें आहे. 'कमळवेलीने' हिरवटपणा हटवून हिरव्यागार प्रकृतीची संभावना केली आहे. ती मला स्वागतार्ह वाटते.

नीलानगर, सोलापूर
ता. ५-८-१९५२

—द० रा० बेंद्रे

महाविद्यालयांतील माझे
प्रेमळ गुरुवर्य
**प्रा. श्री. म. माटे**
व
**डॉ. के. ना. वाटवे**
यांना
विनयपूर्वक अर्पण.

**क म ळ वे ल**

## कमळवेल

नभा ! तुझ्या दारीं
कधी केव्हांतरी
उमलत जाते
प्रकाशाची वेल,
परि माझ्या मनीं
पहा रात्रंदिनीं—
टवटवीत आहे
कमळवेल .....

—निळ्याशा पाण्यांत
सदैव न्हाते,
पोपटी कान्तीची
कविता गाते !

लहरींच्या कुशीं
रसगर्भ कुळीं
हिचा आत्मा वाढे
वर डुले कळी !

येवो समीरण
नेवो गंध—कण
आत्मानंदातच
झुले हिचें मन !

रस जलातला
रस फुलांतला
रस विश्वांतला
हवा हवा हिला

नभा ! तुझी पण
विशालतेची
हवी पखरण
तर ही फुलेल
तरच फुलेल
माझी कमळण !

## हिरवी झाडी

हिरवी झाडी, रेशीमसाडी
पायवाट लाल भांगांत गुलाल
शीतलहरींची स्पर्शमधुरता
सोनेरी उन्हांचा भावनाविलास !
मेघडंबरीच्या गवाक्षामधून—
सायंतेजाचा अचूक झोत
जगन्मातेच्या सस्यहरित
मुखावरती ....

प्रकाशझोत – विविधरंगी—
आभाळामध्ये !
कथकली नृत्यें विजांचीं, मेघांचीं
निळसर गोल व्यासपीठावरी,
दुमदुमे मृदङ्ग !

मैदानावरती मुलांच्या संगें
लहरतो झेंडा !

—दिवसकामाचें फुटतां वारूळ
गजबजीने सारा व्यापला रस्ता;—
रस्त्याच्या पाटीला
पुलाच्या पाठीला
गुद्गुल्या करीत
वर्षाकिशोरी दडे झाडांमागें !

कंपित पिकांत    लवे आगगाडी
धावे लाल लाल
' मेल 'चा डबा;
सावळा धूर    गिरक्या मारी !
—आकाशवाणीचे    उमटती सूर
" चले आवो हमारे अंगना
" चले आवो हमारे अंगना ! "

## दोरीवरचें पातळ !

लटकतें दोरीवरी
आज हिरवें पातळ
घडी मोडूनिया ज्याची—
झाला नाही फार वेळ !

आज इथे आणि तिथे
येई कंकण—झंकार
उष्ण तरुण रक्ताचा
उच्चारीत अनुस्वार

काळी पोत गोऱ्या कंठीं
दावी लाडिक लगट
तास बिल्वरांवरचे
नव्हाळीने मिरवत

उभी बुजून दाराशीं
कोरी मखमली चप्पल
कोरी ट्रंक सामानांत
करी उगाच धांदल

—आज फिरती घरांत
दोन अचपळ डोळे
दोरीवरचें पातळ
मंद झुळुकीने हले !

## तुझे ते डोळे

अशीच एकदा–
उष्ण जळाने नुकतं न्हाऊन
उभी तूं होतीस सोनेरी उन्हांत–
भिजलेले केस सुकवायासाठीं !

सुवर्णसंधीला मीहि तेथे आलों
देखिले आणि तुझे ते डोळे,
मधुर, मदिर लावण्यमंदिर
तुझे ते डोळे !
प्राशिल्यावीणही जयांतील मद्य
उन्मत्तता आणी असे मधुघट !

नुकती न्हाल्याने तुझ्या नयनांच्या
भिजल्या पापण्या ओल्या केसांसह
दिसल्या कशा छे, अवर्णनीय !
पापण्या, कीं तीं सानशीं दळें
आणि तयांत तीं–तीं–कमळें;
जीवनजळांत– बुचकळलीं
टवटवीत नेत्रकमळें !
मदिर किती, मोहक किती ! ........

कमळेंच तीं, कारण त्यांना
भोवतालाला धुंदाविणारा

अपार्थिवसा
गंधही होता
हें जाणवलें मना
जेव्हां........
आंब्याच्या कोवळ्या पालवीपरी
थरथरत्या लुसलुशीत
ओठांचें ओठांशीं    जाहलें मीलन !

## ते हात

सडा शिम्पिती सकाळीं
माझ्या घराच्या अंगणीं

गाई सुगंधित ओळी
कंकणांचा प्रतिध्वनि !

रांधावया कोंडाकणी
ओतिताती जीवप्राण

सजविती पुष्पपात्र
उजाळिती नीरांजन !

जोजविती, जोपासती
पांखिफुटया लेकरांना

आणि लेकरूं झालेल्या–
कधीं कधी माझ्या मना !

कुरवाळिती हें घर
रात्र करीत चंदनी

गातें मन स्वप्नांतही
कंकणांचा प्रतिध्वनि !

## गावीं जातांना—

भल्या पहाटे उठून
केलें सारें फराळाचें
मन करूं लागे काम
तुला गावाला जायाचें

काय घेतलें—राहिलें
केली चौकशी तीनदा
परी आळशाची तुझी
आहे धावपळ सदा !

टांगेवाल्याची धांदल
आणि सामानाचा खल,
किती बोलायाच्या गोष्टी
गेल्या राहूनिया ओठीं ....

ताजा निरशा दुधाचा
दिला करूनिया चहा,
परी सुपारीची गोष्ट
कशी विसरलें पहा

—चिमूट ही चवदार
माझ्या राहिली हातांत
तुझ्यासाठी ठेवितेंच
आता जपून ओठांत !

## अरे छायाचित्रकारा !

छायाचित्रकारा, आता
नीट कॅमेरा लाव हो
माझ्या लेकराचा फोटो
छान यायला हवा हो !

तुझ्या कॅमेऱ्याची कळ
मिटायाच्यां आधीच हा
कांही खेळ आठवून
थेट उठेलच पहा

—तरतरीत हें नाक
याया हवें माझ्यावाणी
आणि कपाळही तसें
दावो बुद्धीची निशाणी !

डोळे, उंच भुंवया त्या
तिच्यासारख्या येतील
केस माझ्यासारखेच
भोवऱ्यांत वळतील

माझी मिष्किल नजर
तिचा सावध कटाक्ष
माझा कवि-पणा थोडा
तिचें रसिकत्वीं लक्ष !

आणि आम्हां दोघांच्याही—
व्यक्तित्वाच्या बेरजेंत
कांही अधिक मिळालें
तें तें पहा कॅमेऱ्यांत

—वृथा झटतों मी नित्य
चित्र रेखाया हें उरीं
सारें चंचल मम-त्व
निसटतें माझ्या करीं

अरे छायाचित्रकारा ....
नीट कॅमेरा लाव हो,
तुझ्या काचेवरी तरी
स्थिर—अस्थिर एक हो !

# माझी मराठी

माझ्या मराठीची गोडी
मला वाटते अवीट
माझ्या मराठीचा छंद
मना नित्य मोहवीत !

ज्ञानोबांची–तुकयांची
मुक्तेशाची–जनाईची
माझी मराठी चोखडी
रामदास–शिवाजींची

'या रे या रे अवघेजण'
हाक मायमराठीची
बंध खळाळा गळाले
साक्ष भीमेच्या पाण्याची !

डफ–तुण्तुणें घेऊन
उभी शाहीरमंडळी
मुजऱ्याची मानकरी
वीरांची ही मायबोली

नांगराचा चाले फाळ
अभंगाच्या तालावर
कोवळीक विसावली
पहाटेच्या जात्यावर !

—नव्या प्राणाची तुतारी
कुणी ऐकवी उठून
मधुघट अर्पी कुणी
कुणी माला दे बांधुन !

लेक लाडका एखादा
गळां घाली वैजयन्ती
मुक्त प्रीतीचा, क्रांतीचा
कुणी नजराणा देती

हिचें स्वरूप देखणें
हिची चाल तडफेची
हिच्या नेत्रीं प्रभा दाटे—
सात्त्विकाची—कांचनाची !

कृष्णा—गोदा—सिंधुजळ
हिची वाढविती कांती
आचार्यांचे आशीर्वाद
हिच्या मुखीं वेद होती

—माझ्या मराठीची थोरी
नित्य नवें रूप दावी
अवनत होई माथा
मुखीं उमटते ओवी !

# दिवा विझविला

दिवा विझविला जळजळणारा
अन् पूर्वेच्या खिडकीमधुनी
किरणांचा तर झोत पसरला
कण कण चांदी देत फेकुनी !

कडुनिंबाच्या झाडामागुन
हासत होता पूर्ण चंद्रमा
विरळ पांढऱ्या आत्मप्रभेची—
सभोवतालीं घेउन सुषमा !

—चंद्र पाहिला असेल मागे
किती जणांनीं, मीहि कितीदा
परी आजचा पूर्णचंद्र हा
मजला कांही नवाच गमला

बालसखीचा गोल चेहरा
मनास रुसल्या समजावित कीं,
अर्धा खाऊ मधुरपणाचा
तेव्हांपरि मज आज देत कीं ?

कीं, विरहान्तीं आईसंगें
समईशीं गुज बोलत बसलों
तेंच काय ये वर्षत आता
सर्वांगीं मी त्यांत नहालों !

साखिच्या हातीं हात ठेवितां
भरल्या रातीं पहांट फुटली
तीच मनाच्या कडेकडेला
विरघळतां कीं साखर उरली ?

—जननान्तरिंचा मित्र काय हा
क्षणैक मजला भेटुन गेला,
कडुनिंबाच्या झाडामागुन
हात गळ्यामधिं घालुन गेला !

# केळिच्या हो बागेवरन

केळिच्या हो बागेवरन
गेली पोपटांची जोडी
गेली राजसांची जोडी !

रंग हिरव्या पानाचा
नववधूच्या चुड्याचा
डौल गोजिरा गतीचा

जोडी पाहून वरची–
केळ हसली खालतीं
पानें नितळ डोलतीं....

लाल चोंचींचीं पांखरें
झणीं गेलीं दिगन्तरा
माझ्या ओढून अन्तरा !

–भर दुपारींही कधी
आता उन्हाच्या झळींत
मन बसे ओघळीत,–

पोपटांच्या आठवणी
तेच सुटे सुटे मणी
तेंच केळींवरचें पाणी..... !

## भर दुपार

भर दुपार, भर दुपार
इमारतीची पाठ तापली
खिडकी डोळे मिटून बसली
कुठे निवारा,—बघे साउली
बसे धरूनी दार !
भर दुपार, भर दुपार !

फरशीवर लोळतात काकू
मन्द रेडिओ येतो ऐकूं
शब्द लागती मनांत सरकूं ....
" गंगाकिनार, हो गंगाकिनार ! "
भर दुपार, भर दुपार !

' काव, काव ' कुणि करितो धीट
उचलुनि नेई उरलें शीत
पिंजऱ्यांतला परंतु पोपट
दे न मुळीं हुंकार !
भर दुपार, भर दुपार !

रस्ता डांबर जाळुं लागतो
चौकीमधि पोलीस पेंगतो
पंखा माडीवरून बघतो
छटेल फार, छटेल फार !
भर दुपार, भर दुपार !

—रवंथ चाले दिवसाच्या मनिं
हळूच केव्हां हसतो मधुनी
चंचल संध्या दिसतां नयनीं
विकल लागुनी धार !
—भर दुपार, भर दुपार !

## अर्घ्य

जीवन—जळाची
भरतों ओंजळ
पूर्वेचा झळाळ
दिसेचिना !

अंधुक ढगाळ
माजे चोंहीकडे
मन रुसे कुढे
मनांताचि.

—लवे कधी मात्र
सौजन्याची वीज
झाकावया लाज
मानव्याची

तिजलाच मग
मानूनिया सूर्य
अर्पितों मी अर्घ्य
हातांतला !

## अग्ने ! किमया....

असाच एका सायंकाळीं
घरीं निघालों होतों परतुन
पांढरपेशी उदासतेचा
भार मनावर उगाच लादुन !

लोहाराच्या भट्टिपुढे तों
चमक लालशी दिसून आली
क्षणभर माझी नजर आळशी
तिथेच रोखुन पहात बसली !

अग्ने ! किमया तुझी केवढी
कठोर अवजड लोखंडाला—
संगतींत तें येतां क्षणभर
रंग स्वतःचा तुवां चढविला

कांब गंजली ओबडधोबड
सतेज बनली घण बसतांना
कात टाकुनी जुनेपणाची
साक्षी ठेवुनि त्या ठिणग्यांना....

अग्ने ! तव सहवास लाभुं दे
आक्रसलेल्या मनास माझ्या,
बसूं देत मग घाव कसेही-
वृत्ति तयाच्या होतिल ताज्या !

# मोरपिसावरि लहरी उठती

अलगद कुठुनी सकाळ आली
कुणाकुणाशीं हासत बोलत
नभोवाणिवरि वाजे सनई
सूर इकडुनी तिकडे धावत....

मउ केसांची मनी सांगते–
गवळी गेला दूध घालुनी,
स्टो पुटपुटला कांहितरी अन्
शीळ खुणेची घाली तिथुनी !

अंथरुणावर हालचाल हो
पुन्हा शांतता दिसते सगळी
पाघरुणाशीं भांडुनि थोडी
थंडी हिरमुसलीच जहाली !

साखर पेरित पापण्यांवरी
गुलगुल गोष्टी करिते झोप
विरघळतीं स्वप्नांतच स्वप्नें;
द्राक्षें गळतीं आपोआप !

मोरपिसावरि लहरी उठती–
हाका मारी परंतु आई,
–हवेंच 'बाळा' उठावयाला
तिला कशाची नकळे घाई !

## आहे मजा आईचीच

गोड एखाद्या सकाळीं
जरा उठावें मजेंत
तोंच ताई म्हणे कशी—
‘ नाही अभ्यास करीत ? ’

—आणि मोत्यासंगें कोठे
थोडें दौडतां बाहेर
दादा गर्जती वरून
कोठे पळाला हा चोर ?

शेजारची लिलूताई
मग येई विचाराया—
गृहपाठ कोणता रे
काल गुरुजींनी दिला ?

गिचमीड अक्षरांचीं
आता उघडा पुस्तकें
आणि बसाच सारखें
त्यांत खुपसूनि डोकें !

आई मोठ्या ऐटींतच
पाटावरून सांगते—
‘ दिनू, वेळ झाली ना रे,
पान आताच मांडतें ! ’

—जेवतांना कधी वाटे
शांत बघून आईला
आहे मजा आईचीच
तिला कांही नाही शाळा !

# त्रास !

नवें नवें कांहीतरी
लिहायाला बसतों मी
तोंच येती युवराज
देत छोटीशी सलामी !

माझ्या उमलत्या ओळी
फराटयांनी शोभतात
पेन काढून घेऊन
छोटे हात लिहितात !

कधी निघावें बाहेर
तोंच वाटेंत नेमका–
बॅट घेऊनि उभा हा,
म्हणे–" दादा, चेंडू टाका."

काव्यशास्त्रविनोदांत
आणि कोणाशीं रंगतां
' चला सुट्टी झाली ' म्हणे
ओढी धरूनिया हाता–

' त्रास देऊं नको त्यांना '
म्हणून ती त्याला नेते
परी माझें मन त्याच्या
मागे मागे रेंगाळतें ! ...

## कृष्णेचें पुनर्दर्शन

—बेळगांवाहून पुण्याला जातांना
कृष्णाबाईच्या पुलावरून
चालली गाडी—

धडाड धडाडऽ धडाड धडाडऽ
ओणवले कोणी
पहावया पाणी
पैसा फेकितात भाविक जन
नमस्कारही करिती कोणी—

पाहिलें मीहि, तावदान दूर करोनिया थोडें
दूर दूरवर....
हारीने डोलती हिरवे मळे, छोटया मळया
छोटया मळईत काकडी खात
उभा होता बाळ....
बालपणींच्या माझ्या फोटोंतली माझीच मूर्ति
जणू उभी होती....

मूर्ती ती पळाली तेथुनी हळूच
कृष्णेच्या कांठाने हरीपुराला—
कृष्णावारणेच्या संगमावरती डुंबावयाला—
रुपेरी वाळूंत पाण्याच्या ' पाटीने ' हुतूतूचा डाव
मांडावयाला !

सौंगड्यासंगतीं चिंचेच्या बनांत पाडलेल्या चिंचा
गाभुळल्या चिंचा....
हळूच टवका वरचा काढावा—
पुष्ट मिठाईचा लचका तोडावा; चालला खेळ.

संगमेश्वराच्या यात्रेंत घेतलीं
साखरेचीं चित्रें....खिशांत राहिलीं, चिकट ती गोडी !
चिकट ती गोडी !
—खेळून पळून दमल्यावरती
मित्राच्या मांडीचें निरागस उसें,—
लोळावें घोळावें
घोळवीत मनीं वारणेची भीती,
कृष्णेची प्रीती !
प्रीतींत पोहाया चालली मंडळी
वाळूच्या गुदूगुल्या पायाच्या ट्राचेला
तरंगांची मिठी रोम–रोमांचाला ! !
लाटेवरी लाट....पाठोपाठ.....

—दमल्या हातांना
दमल्या पायांना
हव्यातच आता
आईच्या हातच्या 'गुळाच्या पोळ्या'
तव्याचें पिठलें
"हळू रे हळू—केळीच्या पानांत जाईल वाळू"
"हळू रे हळू—कांठच्या लोणच्या लागेल वाळू"

—लोणचें संपलें, पानेंही संपलीं
धुतलीं फडकीं पिळून घेतलीं....
चिंचबनांतून सर्वांच्या मागून
जरा थकलेली
चालली ‘ ती ’ मूर्ती
नाजूक मूर्ती............

—धडाड धडाड धडाड धडाड !
पाहिलें मी पुन्हा
होता दुजा पूल, नव्हती ती कृष्णा
गाडीने आणिलें होतें मला दूर
खेचीत होती ती मला दूर दूर

## ती शाळा

चावडीच्या पाठीमागे
जुना ‘ सरकारी वाडा ’
अर्ध्या पडक्या भिंतींचा
थर पांढरा केवढा !

पटांगणाचा सोबती
उभा जुनाट पिंपळ
अजूनहि येते कानीं
त्याची मंद सळसळ

खिळखिळे झाले गज
अशा खिडक्या लांबट
छपराच्या कौलांतून
ऊन हळू डोकावत !

खाली धुळीची जमीन
राठ टेबल समोर
किलबिल थांबे क्षण
छडी नाचता ज्यावर....

चिंचा-पेन्सिलींचा सौदा
अंकगणितांचे ताळे
नवा शर्ट—दहा बुक्के
सारें गुपचूप चाले !

तुळशीशीं जातां उन्हें
घणघण वाजणारी
उंच आढ्याशीं टांगली
घंटा ‘ घोडी’च्या शेजारीं !

‘ शाळा सुटे–पाटी फुटे ’
घरा वळतीं पाउलें
–वना निघालीं मेंढरें–
वाट त्यांतून मा मिळे !

अशी माझी उंच शाळा
होती पिंपळाजवळी
मन भिरभिरें तींत–
कधी बनून पाकोळी !

## हिरवीं कोडीं

कधि ओढ्याचें गोडें पाणी
नेण्यासाठी यायचीस तूं
किती वेळचा ओल्या हातीं
झराच झाडित राह्यचीस तूं

—शिंतोड्यांनी त्या व्हायाची
अपूर्व थरथर या जीवाची !

कधि चवळीच्या कवळ्या शेंगा
शाळेमधि आणायचीस तूं
लपवुनि छपवुनि सारी ओंजळ
माझ्या करिं निरवायचीस तूं

त्या चवळ्यांची हिरवी गोडी
फुलवायाचीं अनंत कोडीं !

कधी दारच्या झोपाळ्यावर
गाल फुगवुनी बसायची तूं
'झोका दे रे' म्हणून ऐटिंत
हुकूम सोडित रहायची तूं

त्या झोक्यांचा झुलता वारा
चवऱ्या ढाळायचा शरीरा !

—तो ओढा, ती शाळा, तें घर
धुक्याधुक्यामधि झालें धूसर
परंतु केव्हां—अशी अचानक
अशी अचानक होते थरथर

हिरवीं कोडीं मनांत फुलतीं
झोपाळ्यावर झुलत राहतीं !

## मामाचा गाव आला...

—झाली थकून आडवी
अर्ध्या चंद्राची सावली
पांद चिखल-कांटयाची
हळू मागे मागे गेली

‘ शीतळाईच्या ’ ओढ्याच्या
हातांतली घुंगुरकाठी—
खुळ खुळ खुळ करी
बैल उताराने जाती !

दिसे गाव चिमुकला
वाडा यक्षलोकांतला
कुणी अल्गद आताच
इथे आणून ठेविला !

आम्हां पेंगल्या मुलांना
आई म्हणताहे, ‘ उठा,
मामाचा गाव आला
तट दिसतो ना मोठा ! ’

ओल्या विरळ वाळूंत
चाक पाडिते चाकोरी
गाडी बैलांच्या मानेला
थोड्या गुदगुल्या करी

कळकीच्या 'बेटां'तून
वारा अल्गूज वाजवी
चांदण्याचा कवडसा
पाण्यामध्ये गातो ओवी !

—भल्या मामाचें-मामीचें
आता भेटेल गोकुळ
फांदीवर पिकलेलें
साखरेचें सिताफळ !

## माझ्या अश्रूंनो

माझ्या अश्रूंनो, अश्रूंनो
कां रे अनावर होता ?
काय कळली तुम्हांला
माझ्या अंतरींची व्यथा ?

सात पाताळीं दडलीं
नागनागिण्यांचीं कुळें
काय त्यांतीलच कोणी
तुम्हां हळूच दंशलें ?

शिळंधार पावसांत
तळें दिसेनासें झालें
कुणी दाविलीं तुम्हांला
माना मोडलेलीं फुलें....

माझ्या नयनबाळांनो
कां रे अनावर होता ?
शान्तवाया श्रमूनिया
दुःख माझें पालविता ?

## ढगांमागे ढग उभे........

ढगामागे ढग उभे, कधीचे आभाळीं
अडवींत प्रकाशाचीं, किरणें सगळीं

उघडलें जाईना, नभाचें फाटक
सूर्याच्या रथाला, जणू हो अटक........

अंगणांत लाविला मी, चन्दनाचा मळा
प्रकाशाच्या मांयेवीण, सुकून चालला

कोसळा ढगांनो ! कोसळा तरी रे !
होऊं द्या चिखल, येऊं द्या सरी रे ! !

चिखलांत जगवीन, कसें तरी 'तरु'.......
अता सूर्यतेजावीण, नका देऊं मरूं.......

विजेच्या गळ्याचीं, तुम्हांला शपथ
सागरपित्याची, तुम्हांला शपथ !

अंगणांत लाविला मीं, चंदनाचा मळा
प्रकाशाच्या मायेवीण, सुकून चालला–

# नकोच दर्शन

—आणि पुण्याच्या नव्या पुलावर
फिरावयाला पाहिल्या प्रहरीं
जातां, बसलों आनंदाने, त्या दगडांच्या कठड्यावरती
नदींत कोणी करितो स्नान,
कुणी टाकुनी बसला जाळें....

मधुर धुक्याचा सारुनि पडदा
निघते गाडी मुंबईकडे, उत्साहाची वाजत शीट,
जणू कुणी कन्यका निघाली घाइघाइने कॉलेजाला !
'देहू' 'खडकी' मनांत घोळत
सायकलीवर डबे निघाले
नरम गरम आंतल्या हवेने !

—मी बसलेलों नव्या पुलावर
मन माझें त्या हवेंत न्हात
उत्साहाने गाणें गात........
तितुक्यामध्ये खुसखुस, धडपड
ऐकूं ये पाठच्या बाजुला
वळुन पाहतां कमानीमधे, धडपडणारें, तडफडणारें
घुबडाचें पिलुं दिसलें मजला....

....अता संपला त्याचा 'दिवस'
डोळे त्याचे अता जायचे !
निराधार कोवळें पोर तें—

टकाटका मजकडेच बघते
भिडवित डोळ्यालागी डोळा;
शरणार्थीचा नयनीं भाव
—कपोत जैसा शिबीपुढे त्या— !
घाबरलेले डोळे त्याचे !

झटकन् मी पण मान वळविली
अपशकुनी हें नकोच दर्शन....
दिवसच माझा वाइट जाइल....
रामप्रहर हा ! रामप्रहर हा !....
—परंतु, त्या त्या नयनांमधला
भाव निरागस करुण कोवळा
कुणासारखा तरी वाटला,
आणिक चटकन्
आठव आला—

—रुग्ण, जर्जरित मम बाळाच्या त्या नयनांचा
—करुण, अबल, मृदु त्या नयनांचा
—' कडेवरी घ्या, घ्या ' म्हणणाऱ्या त्या नयनांचा—
उठलों....
उठलों, वाटत
पिलास घ्यावें, कुरवाळावें,
कुशींत न्यावें—

पुन्हा आणखी मान वळविली—
—पण तें गेलें होतें तेथुन
बहुधा ऐसें म्हणत मनाशीं,
' अपशकुन्याचें, या पाप्याचें
नकोच दर्शन, नकोच दर्शन ! '

## संपला सिनेमा

—संपला सिनेमा....
समोर निर्जीव   पांढरा पडदा
ताठरपणाने   उभा राहिला !

—थिएटराचा   कोंडला श्वास
एका झटक्यांत   मोकळा झाला....
घुर्रर् ऽ घुर्रर् ऽ
करणारा, बेटा   लाडिक पंखा
टकाटका खाली   पाहूं लागला !

आंत, अंधारांत
स्प्रिंगवरती
कशीं अल्लाद
बसलेलीं मनें
प्रकाशांत येतां   ठेंचकाळत—
घरंगळत—   चाललीं घरीं
चाललीं घरीं !

# विटेवरी

विटेवरी वीट उभी
तिथे उभा पांडुरंग
सिमिटाच्या विभूतीने
त्याचें माखलेलें अंग !

त्याला आपादमस्तक
घर्मबिंदूंच्याच माला
कटीं बांधिली कसून
पटकुराची मेखला—

कटीवरी ठेवी हात
मेस्त्री जरा जातां दूर
कामकरिणीच्या संगें
थोडें बोलला चुकार !

तोंच, ' मेस्त्री आला, लेका '
भोवतालीं उठे हूल
जाई तंबाखूसहित
मुखीं घाईने तांबूल !

—विटेवरी चढे वीट
वर चालला बंगला
मध्ये बसतो चेपून—
ओल्या सिमिटाचा गोळा !

# गौरवर्ण हा तुझा चेहरा

गौरवर्ण हा तुझा चेहरा
मला मोहवी सदाकदा रे;
तुझ्यासवें हासतां विसरतों—
मनांत माझ्या किति विपदा रे !

दंतकळीविण छोटी जिवती
हास्य मिरवितें देवाघरचें
पापणींतल्या निर्मळ विश्वीं
प्रकाश इकडे—तिकडे नाचे

परिचय कांही महिन्यांचा तर—
कशी जोडली इतुकी मैत्री ?
पूर्वजन्मिची खूण कशाची
आढळली तुज माझ्या नेत्रीं ?

स्वानंदांतच कीं तूं रमसी
जशी जळावर कळी डुलावी,
कमलपत्र मम चित्त बने अन्
तव लीलेचा अन्वय लावी !

जगांत असुनी जगांतलें ना
असें कांहिसें येथे उघडें
पापणींतल्या निर्मळ विश्वीं
आशेचा मज किरण सांपडे !

बाळा ! जगण्याच्या गणिताची—
अंकमोजणी दिनभर करितों
तुझ्यासवें हासतां मात्र हा—
कधी अचानक ताळा जमतो !

# दहाच वर्षें....

दहाच वर्षें मधे लोटलीं
आणि घडुनि ये कसली किमया
पहाट संपुनि—अरुण उगवले
गुलाबरंगी दावित माया !

खेळ दावितो अंगांगांतुन
जीवनांतलां जादूगार
विकासांतला विलास असला
मनीं वर्तुळें उठवी फार !

दहाच वर्षें मधे लोटलीं
कशीं न कळतां दळें उमललीं
जीवनपूजा सजवायाला
गौरी कोठे उत्सुक बनली ?

—आंत कुणी कापूर पेटवी
ज्वाला ती मस्तकास भिडली;
रंध्रारंध्रातूनि झळाळत—
बाहेरीचें त्रिभुवन उजळी !

—दुनिये, तुझिया पोटिं नांदती
दंभ, अनीती आणि पाप गे,
परी फुलविसी अशी किशोरी
तुला तुझे अपराध माफ गे !

## विसंगती !

कालपरवाच आम्ही        उधळल्या रे अक्षता
पानसुपारी वाटली        आम्ही होऊनिया स्वतां....

—आणि आज संध्याकाळीं   फिरावयाच्या मिषाने
आम्हां पुढून जातांना     टंच होशी अभिमानें

सळ्सळ्तें पांचवारी       उंच टाचेच्या बुटाशीं,
कसा अल्गद अल्गद       तिच्या संगत चालशी !

खोविलेंस कोटावरी       बटमोगरीचें फूल
आम्हां आनंदच त्यांत     बघून हा नवा डौल

आम्हां मित्रांच्या नजरा   परी असा कां टाळिशी
कांही नव्या हिशेबांत     नव्यानेच घोटाळशी ?....

संगतींत विसंगती
आम्हां दिसते रे न्यारी,
—मद तिच्या शरिरीं अन्
धुंदी चढे तुझ्या शिरीं !

# झाडामागुन चंद्र हासला....

झाडामागुन चंद्र हासला
कुठे धावते तुझी दुचाकी !
शीळ जणूं वाऱ्यांत संचरे,
लहर प्रीतिची स्पर्शांतुन कीं !

मऊमऊ स्प्रिंगच्या गादिवर
अल्गद घेसी उशी मजेंत
टंच हवेने भरले टायर
तेही आले खुशीखुशींत ! !

पाउलवाटेवरील गवता
दाबित–दापित पुढे चालली–
दो चाकें हीं चमचमणारीं
चंद्रकरांना भोंवळ आली !

–आणि पुलाच्या वळणावर तर
तुला पाहुनी हसला कठडा,
रुक्ष तयाच्या जीवनांत जणु
कुणी फिरविला सोनकेवडा–

वेळुवनाला राहवेचना
लकेर उठवी अखेर गोड !
परी अशांना हेटाळावें
ही तर नित्याची तव खोड !

—मागे बघ ना ! चंद्र हासतो....
कुठे चालली तुझी दुचाकी
शीळ घालिसी मनांत कसली
हळू हळू कुणि ऐकेलच कीं !

# मध्यान्हवेळीं

मध्यान्हवेळीं
समोरच्याच लालट वाटेने
मजपुढे आला– तांडा गुरांचा....
रस्ताही व्यापून खाटीकखान्याची
वाट चालणारा
थंड लगबगीने पुढे सरणारा
गुरांचा ओघ !

शिंगेंच सारीं....
कांही उंच रुंद
कांही आखूडशीं
कांही टोकदार !
कांही सुने गळे
दोरखंडानेच
जखडलेले
कोठे एकत्र !–
अजून संथ
रवंथणारीं
कांही भोळीं तोंडें–
अजून हळूच
कडेचें गवत
न्यहाळणारे

ओढाळ डोळे–
चाललेच होते....
चाललेच होते–        सरकत, अन्
                    सरकवीत
                    सर्वांचे पाय !–

पायांच्या खुरांनी
वर गगनांत          होती उधळत
                    लालशी धूळ !
गाव–वेशींतल्या–    बाल्यांत पाहिल्या–
' त्या धुळी ' परीच लालशी धूळ
जेव्हां,
तृणाचा गोडवा        आणीत ओठांशीं
वत्साच्या ओढीने     त्वरें धावणारीं
परतलीं घरां गुरें....
दोन धुळींच्या त्या   वावटळींत हे
                    कोंदाटले डोळे....
                    बावरला श्वास....
                    अन् कुठे भिराभिरणारें
                    ब्लेडचें पातें
                    मनाला कापीत
                    गेलें चर्र्रदिशीं !

## कशासाठी

कशासाठी केला
        एवढा अटाट
माझी मज वाट
        सापडेना !
वृथा वाटे झाली
        सारी धावपळ
अंतरींची कळ
        मरेचिना !
पाठीचा हा भार
        ठेवूनिया दूर
वाटे—पोटभर
        रडूं ऐसें
—परी मन-अश्रू
        टिपावें स्वतांच
दावावी लालूच
        कांही नवी
आणि पुन्हा उरीं
        फुटेतों, फुटेतों
धावावें, दिसतो—
        नेम हाच !

# वरात

सवें घेउनि लाडक्या लेकरास,
सहज होतों चाललों मंडईस !
प्रेत कोणाचें येत तों पुढून,
मना गमलें हा होय अपशकून !

प्रेतयात्रा मार्गांत ती बघून,
चित्त माझें जाहलें उदासीन,
प्रेत बाळानें पाहिलें कधी न
म्हणुनि भ्याला कां पाहिलें वळून

परी बालक तो मोदभरें डोले,
आणि हसुनी बोबडे बोल बोले–
" मौज सांगूं ताईस ही घरांत–
झोपलेल्याची पाहिली वरात ! ! "

# येती वळिवाच्या सरी

सारे तुडविती मला
जड रोवून पावलां
जोडे-बुटांच्या ठोकरी
लाथाडितात देहाला ! १

पान खाऊन ऐटींत
लाल पिंक टाकी कुणी
कचऱ्याने घाली स्नान
कुणी बादल्या ओतुनी ! ! २

कधी लोखंडाची धाव
जाई घालीतची घाव
माल—मोटारींचें चाक
लागे मलाच पेलावं ! ३

तोंडा फासिती डांबर
जणूं नटवाया मला
खरा आराम हवा हो,
साऱ्याजणांच्या देहाला ! ४

उन्हातान्हांत तापावें
उघडें मी एकटेंच,
काळ्या रात्रीं अंधारांत
उभा सेवेला आहेच ! ५

गरीबाच्या या सेवेची
किती कुणाला कदर
कधी अश्रूंच्या दंवाने
जातो भिजून पदर.... ६

—गृहहीन मात्र कोणी
कधी निजे अंकावरी
त्याची थोपटता पाठ
येती वळिवाच्या सरी ! ७

## नागमोडी लाल रस्ता

नागमोडी लाल रस्ता
त्याच्या टोकाचें तें घर
तेथल्या त्या स्नेहलीला
आणि स्मिताचे पाझर....

आषाढाची थंड धारा
चव चहाची वाढवी
नर्म संभाषणांतच–
ओठीं सिग्रेट विरावी

हासवितां एकमेका
स्वत: स्वताला हसावें
चंचल अन् मर्यादेंत
उणें–उलटें बोलावें !

कधी भरल्या ढगांत
वीज चमकून जावी
अंधारली मनोभूमी
क्षणार्धींच उजळावी !

चित्तामधून कविता
शब्द घेऊन उठावी
फूलपांखरें क्षणांचीं
आसमंतांत फिरावी—

—नागमोडी लाल रस्ता
त्याच्या टोकाचें तें घर—
निरागस सोनचांफा
पुढे स्वागता आतुर !

जीवनाच्या मार्गांतलें
एक कोरीव तें लेणें
आदराने— ममतेने—
आता दुरून पाहणें !

## फीर मना मागे आता

असावधपणें-अपराधाविना
काल पाठीवरी असा, उडाला चाबूक !
घेऊन ये वरी रक्त नि कातडें
पिळवटून क्षणांत, आंतलें मांस....
आटली आंतच आक्रोशाची धार
दाखवूं कुणाला असा वेडा वार ?
    शिरे माझें मन, मुकें जनावर,
        माझ्याच कुशींत
समजावूं कसा त्या....दुबळा, मी अशक्त !
जीवन हें कुंठलें–बंदच गल्ली
धावूं तरी कोठे–वाटही संपली !
    –फीर मना मागें आता,
        पुरें हें क्रंदन !
पहा नी रस्त्याच्या दोन्हीही कडांना
रुग्णजनांपरी–
महारोग्यांपरी–
कितीक बसले उघडे उघडे देह
–अपराधाविना, असावधपणें
जीवनाच्या ज्यांच्या उडाल्या चिंधड्या....
पूस त्यांचें रक्त
बांध त्या जखमा
फीर मना मागे आता,
    पुरें हें क्रंदन !

# एक पायवाट

सोलापुरांतील– माझ्या घरापुढे
गिरणीची आहे एक पायवाट
पाहतों नेहमी सकाळच्या पारीं
तेथला कांही आगळाच थाट !

पहिला भोंगा होऊन गेलेला
फाटक अजून राहिलें दूर
पूर्वदिशा सांगे रंग बदलतां–
आता दुसऱ्याचा उठेल सूर

औट हातांचे सारे ते देह
जलद लयीने कापिती वाट
बापई–बाया बापई–बाया
धावणारांची एकच जात !

'महादेवा'पाशीं उतार येतां
तेवढेंच मना वाटतें बरें
पाउलांनाही आपुलें सुख
मनच्या मनांत कळतें बरें !

कपाळीं कोणाच्या विभूति दिसे
कोणा न्हालेलींचे केस ओलेचसे
काखेशीं लोंबतें कोणाचें बाळ
जाकीट कोणाचें भडक लाल....

धावतां धावतां खोलून चंची
अल्गद् कोणी पंचम खाई
अन्नब्रह्म लपे पुरचंड्यांतून,
एखादाच ' डबा ' बाजूने जाई !

फाटक्या शर्टांची– विटक्या धर्डींची–
पायवाटेंतून दुनिया वळे
राहिला हा मागे राहिला तो मागे
पुढच्यांना कसा गांठाया पळे !

–समोर उगवे सूर्यनारायण
डांबरी रस्त्याला चाटती किरण,
फिराया निघालीं पाउलें माझीं
वळतीं–थांबतीं– मधें क्षण–क्षण !

## चित्र देवाघरचें

लाल सॅटिनीचा झगा
　　　　त्यांत खुले गोरी कान्ती
चिमुकले गोरे पाय
　　　　स्वच्छ रस्ता आक्रमिती !

डोळे उत्सुकपणाने
　　　　वेध घेती भोवतालीं
ओठ स्वतःशीं बोलती
　　　　मिटे—उघडे पाकळी !

दूर कोठेतरी शाळा
　　　　क्षण तिची नाही स्मृती
हिच्या मनीं सकाळचीं
　　　　किती कमळें डोलतीं....

चित्र देवाघरचें हें
　　　　भूमीवरी चाले काय
अनिमिष पाहतां मी
　　　　क्षण स्थिरावले पाय !

## जयस्तंभ

प्राचीन स्थळांचा एक प्रवासी कुणी
येऊनि वदे मज नवलाची काहणी—
“ पाहिले भग्नमूर्तिचे पाय दोन मी
ते उभे वाळवंटांत धडावाचुनी....
त्यांसमीप रेतीमधे पडुनि राहिला
मूर्तिचा मुखवटा विराट परि एकला !
ती क्रुद्ध दृष्टि, ती जिवणीची ठेवण,
तें चर्येवरचें उग्र करारीपण
त्या चढत्या भुवया, अजून चढल्या वरी....
थरकांप जिवाचा पाहुनि क्षण अंतरीं !
ती कराल मुद्रा उभवी हृदयापुढे—
खंबीर, नृपाचें मनगट, मन, केवढें !
उलथून बाजुला पडलेला चौथरा
उरिं धरून राहे अजून या अक्षरां
‘ मी चक्रवर्ति, सम्राट मंडलेश्वर
मजपुढे नम्र हे कितीक राजेश्वर !
मम पराक्रमाच्या अनंत कृति पाहुनी
जा जगच्चालका ! ओशाळूनी मनीं ! ’
यापरतें कांही उरे न तेथे, परी
अवशेष विखुरले फुटक्या नौकेपरी
अन् तयांभोवती निर्जन नि भयकर
आक्षितिज पसरला वाळूचा सागर !.... ”

# तुझ्या हिरव्या अंगणीं

तुझ्या हिरव्या अंगणीं
माझें पोचतां पाऊल
झळंबली उन्हालाही
गार वाऱ्याची चाहूल !

सखि ! तुझ्या अंगणांत
नाही प्राजक्ताचें झाड
तरी सदैव कशाने
दरवळलें कवाड ?

जनाबाईची गोवरी
बोले, ' विठ्ठल, विठ्ठल '
चंद्रभागेचा कांठचा
लुटिला मी परिमळ

—तुझ्या अंगणापासून
आता जावयाचें दूर,
कसें ओलाडूं ना कळे
ओलावलें दंहिवर !

## कां पुन्हा

कां पुन्हा अशी छेडिसी सतार ?
छेडिसी सतार ?
सुकला तुटला गुंफूं बघसी—
पुन्हा कशाला हार ? १

—मी तर वनवासी रे झालें—
लाज वल्कलांची तुज माझ्या
कनवाळू तूं फार....
प्रिया, कशाला आता वसनें
देसी हीं जरतार ? २

विझले जे, विझविलेच जे,—तें
उरीं कोळसे चार
चेतविसी का, पुन्हा राजसा
तोच लाल अंगार ! ३

अता उजाळा मिळावयाचा
दिन गेला रे दूर
परंतु अवघी जळून जाइन
होसी कां रे क्रूर ? ४

क्रूर दया ही नको दाखवूं
....नकोस छेडूं तार !
नकोस छेडूं तार !
का पुन्हा अशी छेडिसी सतार ! ५

## श्रावणांतली सकाळ

गर्दीपासून
जरा दूरच्या या
हिरव्या माळावर—
श्रावणांतली
गवती दुनिया
झाली आहे जागी !
—रेंगाळत आहे
पांढरा मेघ
निळ्या कोपऱ्याशीं....
गिरणीचें, काळें—
ताठ धुराडें
मान उंचावून
धूर सोडताहे
दमादमानेच !
—हालत आहेत
मंदटपणाने
निंब—बाभळीचीं
अश्राप पानें !
घर्रर्र करीत
मुकाटपणाने
वस्ट कापताहे

पहिली ‘ बस ’....
कावळा एखादा
एकाच डोळ्याने
अंदाज घेत
हळू उडताहे !
–खडकांतल्या
लालशा पाण्यांत
धोबी धूत आहे
पांढरा मळ;
गवत खाणाऱ्या
गाढविणीला
निवान्तपणाने
पीत उभें आहे
गोजिरें बाळ !

# चांदण्यांत सहलतां

चांदण्यांत सहलतां
मन आलं फुलारून
रोम रोम थरारून

कुजबूज—कोलाहल
दूर विसावया जाती
शांत नीरव भोवती....

कोठलीशी रातराणी
टाकी हळूच निश्वास
येतो मधुरसा वास

तरुतळीं आडोशाला
छाया गुज करितात
गळे घालून गळ्यांत !

राममंदिरीं वाजते—
शेजारतीची सनई
पुसटसा सूर येई

वारा येतां हसे गाली
वर नारळीची झाप
आणि लाजे आपोआप !

चांदण्यांत सहलतां
मन आलं फुलारून
रोम रोम थरारून !

# जाहलें सार्थक

—जाहलें सार्थक
अनंत मुळ्यांनी शोषिल्या रसाचें,
काया रोमांचली
फुलला मोहर सर्वांगांतुन
सुगंधाचे अणु आले उमळून !

असें लाभलेलें अपूप हें ' देणें '
वाटतें, आणखी आणखी फुलावें !
....इथे लटकावीं तिथे लटकावीं
लाख आम्रफळें;
पोसतां तयांचीं इवलालीं अंगें
देहाची सराई पाजीत रहावी तयां जीवरस !
वाटतें—
विश्वाला चोरून मी यांना—
या मधुघटांना
हळू लेववावीं भर्जरी लेणीं;
परिपूर्णतेंत ह्या खुपसल्या जाव्या
थकल्या पिसांच्या कोरड्या चोंची
तहानलेल्या........

कोण माझ्यापुढें
परंतु नाचे ही— तान्हेली हावरी—
स्वप्नींची जखीण ?

–हीच ती काठी
राखणदाराची,
अपहारकर्त्या राखणदाराची !

वाटतें,–आताच पळावें येथून
घेऊन उराशीं साऱ्या मधुकळ्या....
अरे, जखडलों आहे खोल खोल
माझ्याच मुळ्यांच्या
अनंत धाग्यांनी
धा ग्यां नी !

## रिकामें टेबल

रिकामें टेबल....
टेबलावरती
अर्धेच पॅटीस–
जिलेबी-तुकडे गाळिती रस–
दीनवाण्या मऊ केळियांच्या साली
संत्र्याच्या रसाने माखलेल्या बिया–
ओशट चमचे
पडले पालथे
सिगारेटी तप्त घासती माथे !
अर्धींमुर्धीं कांही पाण्याचीं ग्लासें
मिरविती ‘ त्या-त्या ’ ओठांचे ठसे–
कपांतूनि कोठे उरे शिष्ट-चहा !
राखाळलेलीं उदबत्ती-घरें–
चिनाई मातीचे फ्लॉवरपॉट
उभे निर्विकार !
रिकामें टेबल....
रिकामीच खुर्ची !....

रिकामें टेबल
रिकाम्या खुर्चीच्या कानांत सांगते–
“ सुखी ग तूं बाई ! तुझ्यावरी आता
हें ओझें तरी नाही ....ओझं तरी नाही ! ”

## नित्य तळपते दुपार

असें आमुचें हें जिणें
झालें उदास बापुडवाणें
नित्य तळपते दुपार
आणि उन्हाचाच मार !

बरें खावयासी नाही
बरें ल्यावयासी नाही
आंत–बाहेर भोगावी
वखवख ठायीं ठायीं !

एका एका आघाताची
एक एक सुरकुती,
गांठी वेड्यावाकड्या अन्
जाळीं विणलीं जाताती

जाळ्यामध्यें खुरडावें,
जाळें खांद्यावरी न्यावें
क्षयी आशेचीच पेंढी
घाणा कसावसा ओढी

आता गिळेनाती घोट
कसा व्हावयाचा स्फोट
....स्फोट ?

## कळींतून पाकळींत

माझ्या छोटया अंगणाची
येतां चढून पायरी
एका दृष्टींतच सारें
घेतलेंस तुझ्या करीं !

वस्तूवस्तूंत मिळाले
तुझ्या नजरेचे कण
नवी सुखाची द्वारका
आली वर उजळून

थरथरत्या पणत्यांची
पहिलीच पडे मिठी
काया–वाचा–मन माझें
सोंपविलें तुझ्या हातीं !

–आता भरपुरांतही
सर्वे जाईन तरून
अशी उमेद अंतरीं
जीव धरी तरारून–

माझ्या अंतरींची व्यथा
तूंच करावी बोलकी
खोल वाहती जखम
तूंच टिपावी हळू कीं !

—परी कोणी टोंचणारा
चोंच मारी पुन्हा पुन्हा
त्यांत तुझा आणि माझा
नाही कोणाचाच गुन्हा

असो व्यथा; सुखकथा
आता मुठींत मिटलों
कळींतून पाकळींत—
उभयता उमललों !

# कधी कधी

कधी कधी वाटे मला
लेकराचें गोड हसें
माझ्या अंतरीं शिरावें
घेत रूप अनारिसें !

कधी कधी वाटे मला
तांबड्या या मातींतून
खूप खूप चालावें मी
पाय येईतों शिणून !

कधी कधी वाटे मला
कृष्णाबाईच्या पुरांत
लाल लाटांशीं खेळतां
जावें असीम पोहत....

कधी कधी वाटे मला
सारा सांडून पसारा
यावा धुंडून एकदा
निळ्या नभाचा किनारा !

कधी कधी वाटे मला
जावें विठ्ठलाच्या गावा
दु:खभार आणि त्याला
सारा सांगावा—वहावा !

कधी कधी वाटे मला
असें वाटूं नये मला,
आणि पाणी लागूं नये–
असें मिठाच्या खडयाला !

## एखादे दिवशीं

कोवळी सकाळ
मनाचा माळ
हिरव्या रसांत—
शिंपीत जाते !

डोळे उघडून
पिसांची सृष्टी
किल्बिल करीत
उडूं लागते !

अजून दूर
उन्हाचा ताण
जागेला प्राण
हसहसतो....

जीवनगन्ध
धुंदींत धुंद
हळूच हळूच
उचमळतो !

## बाजारपेठेंत

गिळूनिया कोलाहल
बंद जाहलीं दुकानें
झगमगत्या गोळ्यांनी
आता मिटलीं लोचनें !

पानवाल्याच्या फळीशीं
एकदोघे कोणी उभे
कोठे षड्जपंचमाचा
सूर अवचित निघे....

गस्तवाल्या गुरख्याचा
मधूनच वाजे बूट
आंत भरल्या पोत्याशीं
उंदराची खुटखूट !

तिजोरीच्या कोपऱ्यांशीं
पहुडली लठ्ठ वही
जणूं बेडूक गिळून
स्वस्थ बसे कुळ्पही !

—तापलेल्या पायरीला
भिडे हमालाची पाठ
आता उन्हें उगवेतों
सारें शांत—सारें शांत !

## आज नवा क्षण

आज नवा क्षण उमलत आहे !
घटका घटका दिवस तापला
माथ्यावर तो दाह साहिला
अता ढगाची कड ओथंबुन– टप टप टप जल निथळत आहे !
या माझ्या इवल्या नयनांनी
विराट रूपा बघतों मोहुनि
कसें तयाच्या अणुरेणूंतुन विश्व नवें अंकुरतें आहे
'रे ! श्रमणाऱ्या तुझीच धरती '
अशी ऐकिली होती गीती
घाम किती सांडला भूमिवर, सुगंध आजि तो दरवळताहे !
दलितांघरच्या दिवलीमधला
दिवा नव्याने जळूं लागला
तो फुरफुरता अग्नि पाहतां– मनांत परमात्मा हसताहे !
इवलें घरटें–इवली पणती
चिंता इवली कशास नसती ?
भितोस कां रे वृथा, मन्मना ! वृथाच नयनीं अश्रू कां हे ?
पूर्वेचा चंद्रमा आपुल्या घराघरांवर चमचमताहे !
आज नवा क्षण उमलत आहे !

## पृथ्वीचे हे संत

श्रावणमासाच्या
सुखद दिशीं
ओलाव्याच्या कुशीं
अचानक अशी
बाळगवताचीं—
हिरवीं पातीं
जिकडे तिकडे
डोकावताती....
रुक्ष खडकाळ
झाकून टाकून
नव्या श्रावणाचीं
नाजुक गाणीं
गाऊं लागताती !

आणि त्यांचीं गाणीं
येतांच कानीं—
ग्रीष्म—वर्षाऋतु
साहिले परंतु
ज्यांनी गवताचा
पाहिला न तंतु
असे मोठे डोळे,
भोळ्या पावलांच्या

कितीक जिवांचे
मोठे मोठे डोळे–
अधाशीपणेंच
न्याहाळताती
कोवळीं पातीं !
थोड्याच क्षणीं अन्
कोठे दडपलीं
कोठें कातरलीं
कोठे कुरतडलीं
कुरतडलीं जातीं
रसाळ पातीं....
फुलाला-फळाला
येण्याच्या आधीच
निर्बीजपणेंच !

—आणखी तरीही
पुढल्या श्रावणीं
नेमेंचि येतात
ओलेत्या कुशींत
निर्भर हसत
पृथ्वीचे हे संत !
गाऊं लागती हे
नव्या दिव्यतेनें
श्रावणाची गीती,
रंजलेल्या माझ्या
मना सुखवीती !

## कारवार

पुढे उचंबळ, खळबळ खळबळ
मंद गरजतें लाटांचें दळ–
क्षणैक नाचुनि रेतीवरती
सरके मागे हें फेनिल जळ !

आईच्या कीं वक्षावरती
अवखळ क्रीडा करितें बालक
पोटींचें तें तरी नावरे
चाले चंचलतेचें कौतुक....

थंड चावरा खारट वारा
सुरु-बनाशीं माझ्याशींही
क्षणैक खिदळुन, कुठे आदळुन
धावायाची करितो घाई !

अंगीं मुरला गार गारवा
तशी अनामिक थरथर तीही
ओलेत्याने जणू हवा ही
पुढून झटकन् निघून जाई !

प्रकाश दीपस्तंभामधला
मधेच झरकन् चमकत येई
नेत्र धावती मागे त्याच्या
तो तर लाटांवरती जाई

—नभिं चंद्राचें कले चांदणें
ढगांतुनी तें उमटे कांही
पुढे उचंबळ ! खळबळ खळबळ
मंद गरजतें सागरजळही !

## जीवनसखे !

याच वास्तूखाली
जाहलें आपुलें
पहिलें मीलन
–सुखें आरंभिला
एक नवा डाव
मेळवूनी गोफ
दोन व्यक्तित्वांचा !

वाटलें-मी असा
हें माझें..तें माझें....
माझें घर-माझी कांता–
माझी प्रीती-माझी कीर्ती !
माझ्या पाउलांच्या
उमटवीत खुणा
वाटे नदीकांठ
सारा मी चालावा –!
परी नियतीने
दाविला किती
किती साक्षात्कार....

कधी माझें मज
असह्य असह्य
जाहलें ओझें;

अवघडून मान
गुळणी फुटावी
अशी आली वेळ !
संसाराच्या भिंती
उलथविणारा
सुटला वारा
असा सोंसाटत–

कधी माझें बाळ
क्षण–वाळिवाने
तुडुंब–भरल्या
एखाद्या नाल्यांत
वहातचि जातां
तृणाच्या आधारें
वाचविलें गेलें !

कधी माझें घर
व्यक्तिं-व्यक्तित्वांच्या
गारगोटयांतून
पेटाया निघालें !
–आणि केव्हां चित्त
शोधतां शोधतां
मॉर्फीयाची गुंगी,
मॉर्फीया बनून–
काळ्या दरीच्याही

कांठाशीं कांठाशीं
तरंगून आलें !

आणखी केधवां—
रम्य उष:काळीं
उसाळाच रस
प्यावया मिळाला !
....पायामध्ये कांटे
बोचले अनंत;
परी तुझ्या स्पर्शे
त्याच काटयांतून–
उठलीं अनंत
अननुभूत
रोमांच-गीतें....
थोड्या गोड वाफा
घेऊन उराशीं
हाकारणाऱ्या
सुखोष्ण नदीच्या
जळकणांमध्ये
केवळ डुंबलें
नहालें शरीर !

दिसामासासवें
आकार घेणाऱ्या
एखाद्या आत्म्याच्या

नानारूपी कळा
पाहिल्या माझ्याच
माझ्या वास्तूखालीं !
—याच वास्तूखालीं
रचिता कविता
सायुज्य—समाधि
भोगली कितीदा
गोड क्लेश झाले
जी उतरावीता !

आणि सायंकाळीं
कधी महात्म्याच्या
प्रार्थनेच्या वेळीं
फुशारलेला
हाच ताठ आत्मा
कसा आपोआप
प्रणमित झाला....
सागराची वाट अन्
चारच पावलें
चालत राहिला....
सखे !
व्हावें सूत्रधार
अशी होती वांछा
आता परी वाटे—

व्हावें कीं बाहुलें;
नाचावें अन् असें
रंगत–रंगत
त्या सूत्रधाराच्या
विश्व–नाटकांत !

## माझें इनाम कवित्व !

‘ एक आण्याचें ’ खेड्याचें
गेलें कुल्कर्णी–वतन
म्हणून हें माझें मन
कधी कधी होई खिन्न


त्याला सांगतों मी केव्हां
घेउनिया विश्वासांत
आणि भाबडेंच तेंही
वच ऐकूनि डोलत....

“ माझें इनाम कवित्व
गावोगावीं गोतावळा
थोरामोठ्यांच्या वंशाशीं
माझा संबंध जोडला !

“ शारदेच्या महाद्वारीं
मला मिळेल पायरी
रसिकांची पायधूळ
नित्य उधळेल शिरीं ! ”

किंमत दीड रुपया

चित्रशाळा
पुणें



## प्रा. वि. म. कुलकर्णी

'विसर्जन' (दीर्घ–काव्य), 'छान छान गाणीं' (बालगीतें) आणि 'पहांटवारा' या काव्यसंग्रहानंतर प्रा. वि. म. कुलकर्णी यांचा हा नवीन कवितासंग्रह प्रकाशित होत आहे. प्रा. कुलकर्णी हे मूळचे सांगली-कडील राहिवासी. हायस्कूल-शिक्षण मुख्यतः सांगलीसच झालें. पुण्याच्या सर परशुरामभाऊ कॉलेजमधून ते १९४२ मध्यें एम्. ए. झाले. बेळगांवच्या लिंगराज कॉलेजांत सहा वर्षें मराठीचे प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर हल्लीं ते सोलापूर येथील दयानंद कॉलेजमध्यें मराठीचे प्राध्यापक आहेत.

हायस्कुलांत असतांना काव्यलेखनास प्रारंभ. जानपद-जीवनावरील कांहीं ललितलेखन त्यांनी १९४० सालीं प्रसिद्ध केलें. अन्य साहित्यक्षेत्रांताहि त्यांनीं मधून मधून लेखन संपादन केलें आहे. ★ ★ ★